# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १५ ◆ अंक ३ ◆ अमरावती ◆ दि. २ ते ८ मे २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


# ९७.७६ % नोटा परत, २.२४ टक्के नोटा आजही चलनात

नवी दिल्ली , २ मे: देशात चलनात असलेल्या २ हजार रुपयांच्या नोटा आरबीआयने परत मागवल्यामुळे देशभरात पुन्हा नोटबंदी चर्चा रंगली होती. त्यानंतर, आता चलनातून २ हजार रुपयांची नोटही बंद होते की काय,असा प्रश्न अनेकांना पडला होता. मात्र, याबाबत आरबीआयने पष्टीकरण देताना २ हजार रुपयांची नोट चलनात कायम असल्याचे स्पष्ट केले होते. आता, आरबीआयकडून २ हजार रुपयांच्या किती नोटा परत आल्या व सध्या देशातील चलनात असलेल्या या नोटांबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार, दोन हजार रुपयांच्या ९७.७६ टक्के

### २ हजारांच्या नोटेबाबत आरबीआयची मोठी अपडेट

नोटा आरबीआयकडे परत आल्या आहेत. पण, अद्यापही ७ हजार ९६१ कोटी रुपयांच्या नोटा चलनात असल्याची आरबीआयची माहिती आरबीआयने दिली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९ मे २०२३ रोजी देशातील चलनात असलेल्या २००० रुपयांच्या नोटा परत मागवल्या होत्या. आरबीायच्या या घोषणेवेळी बाजारातील चलनात ३.५६ लाख कोटी रुपयांच्या २



हजारांच्या नोटा होत्या. मात्र, आता ३० एप्रिल रोजी आरबीआयने आकडेवारी जाहीर करुन सद्यस्थितीत २ हजार रुपयांच्या किती नोटा बाजारात आहेत, त्यांचे वर्तमान मुल्य किती, याची माहिती दिली आहे. त्यानुसार, देशातील चलनात सध्या ७,९६१ कोटी रुपये आहेत. म्हणजेच, या आकडेवारी नुसार गत वर्षभरात तब्बल ९७.७६ टक्के नोटा आरबीआयकडे परत आल्या आहेत. दरम्यान, सध्या २ हजार रुपयांची नोट वैध मानली जात असून चलनात अस्तित्वातही आहे. मात्र, ज्यांच्याकडे ह्या नोटा आहेत, त्यांनी त्या जमा करणेही आवश्यक आहे. नोटा बदलून घेण्याचे आवाहन कायम आरबीआयकडून ३० एप्रिल २०२४ पर्यंतची आकडेवारी जारी करण्यात आली असून देशातील चलनात असलेल्या २ हजार रुपयांचा तपशील देण्यात आला आहे. तसेच, दोन हजार रुपयांच्या नोटा बदलून घेण्याचे आरबीआयचे आवाहन आजही कायम असल्याचे सांगण्यात आले. आरबीआयच्या १९ कार्यालयात किंवा स्पीड पोस्ट करत नागरिकांना २ हजार रुपयांच्या नोटा बदलवून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान, आरबीआयकडून नोव्हेंबर २०१६ मध्ये १००० व ५०० रुपयांच्या नोटा बंद करण्यात आल्या होत्या. देशात नोट बंदीच्या या घोषणेनं चांगलाच गदारोळ माजला होता. त्यानंतर, भारत सरकारने २००० रुपयांची नोट चलनात आणली होती. नव्याने चलनात आलेल्या या नोटेला पाहूनही नेटीझन्सने आनंद व्यक्त केला होता, तर सोशल मीडियातून मिम्सही व्हायरल झाले होते. मात्र, काही वर्षांतच या नोटा आरबीआयने परत मागवल्याने २ हजारांची नोटही लवकरच इतिहासजमा होईल, असेच दिसून येत आहे.

## तब्बल ६ वर्षांनंतर एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार गणवेश कापड

मुंबई: एसटी महामंडळातील चालक व वाहकांना गेल्या ६ वर्षांपासून गणवेश पुरवण्यात आला नाही. २०१९ मध्ये कर्मचाऱ्यांना नव्या पद्धतीचे तयार गणवेश मिळाले, मात्र ते अमान्य असल्याने पुन्हा पाठवण्यात आले. त्यानंतर गतवर्षी पुन्हा यासाठी निविदा प्रक्रिया राबवत अखेर बऱ्याच प्रतीक्षेनंतर एसटी कर्मचाऱ्यांना गणवेश वाटप करण्यास एसटी महामंडळाकडून सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांमध्ये याबाबत कोणतीही उत्सुकता दिसून येत नाही. कारण गेल्या ६ वर्षांत कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने गणवेश शिवल्याने त्या कालावधीतील खर्च एसटी महामंडळ देणार का? गणवेश कापड मिळाले तरी ते किती जोड्या मिळणार, असे प्रश्न कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, याबाबत एसटी महामंडळाशी संपर्क साधला असता, संपर्क झाला नाही. २०१६ पर्यंत कर्मचाऱ्यांना प्रशासनातर्फे कापड व शिलाई भत्ता दिला जायचा. यामध्ये कर्मचाऱ्यांना दोन गणवेश व्हायचे. २०१७ पासून ही पद्धत बदलण्यात आली. चालक, वाहक, अधिकारी यांच्या गणवेशाच्या रंगात फरक करण्यात आला, तसेच कर्मचाऱ्यांना शिवलेला तयार गणवेश देण्यात येऊ लागला, असे दोन गणवेश वर्षातून मिळायचे. मात्र, २०१९ पासून कर्मचाऱ्यांना गणवेशच मिळाला नाही. तत्कालीन परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी २०१७ मध्ये एसटीच्या चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक यांचा गणवेश बदलण्याची योजना आखली होती. नव्या डिझाइनच्या गणवेशासाठी नवी मुंबई येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी संस्थेशी करार करून डिझाईन बनवले.

# विदर्भात अकोला सर्वात 'हॉट'



### तापमानाचा पारा @ ४३.९ अंशांवर
### अमरावती,ब्रम्हपुरी, गडचिरोली, वर्धा, वाशिमही आघाडीवर

अकोला: विदर्भात अकोला सर्वांत हॉट जिल्हा म्हणून मंगळवारी नोंदविला गेला. मंगळवारी अकोला जिल्ह्याच्या तापमानाचा पारा ४३.९ अंशापर्यंत पोहोचल्याची नोंद झाली आहे. अकोल्यासोबतचं अमरावती, ब्रम्हपुरी, वर्धा, वाशिम जिल्हाच्या तपमानाचा पारा देखील आघाडीच्या अंकात पुढे सरकताना दिसत आहे. तूर्त अकोल्याने संपूर्ण विदर्भाला मागे टाकल्याने अकोला जिल्ह्यातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला जात आहे. विदर्भातील अकरा जिल्ह्यात अकोलाने एप्रिल महिन्यात तापमानाचा विक्रम मोडला आहे. हवामान खात्याच्या नोंदित मंगळवारच्या तापमानात अकोला जिल्हा सर्वात हॉट जिल्हा म्हणून गणला गेला. त्यामुळे संपूर्ण विदर्भाचे लक्ष अकोल्याकडे लागले आहे. तसे पाहिले तर मार्चपासूनच अकोला तापायला लागते. मार्च ते मे महिन्यात अकोला जिल्हा दोन-चार वेळा ४४ ते ४५ अंशाच्या पाऱ्यावर जाऊन येत असतो. मात्र यंदा सुरूवातच अकोल्यापासून झाली आहे. विदर्भातील काही जिल्ह्यात तापमानाचा पार विक्रमी नोंद करीत असल्याने मोठ्या प्रमाणात वातानुकूलीत यंत्र, कुलर आणि नैसर्गीक वातावरणाने लोक उन्हापासून बचाव करतात. मात्र तापमानाचा पारा ४४ अंशाच्या पलिकडे गेला की, कुलर, एसी देखील दम धरत नाही. दिवसा तर दिवसा रात्रीच्या तापमानातही फरक जाणवत आहे. दोन ते तीनवाजेपर्यंत उन्हाच्या झळा कायम राहतात. त्यामुळे तीन ते चार तास तापमान किंचतसे ढासळते आणि सकाळी नऊ वाजतापासून पुन्हा कडाक्याचे उन्ह पडू लागते. उन्हाच्या कारणामुळे अनेकजण विदर्भाबाहेर फिरायला जातात. आणि ईतर लोक विदर्भात येणे टाळतात. मंगळवारी हवामान खात्याने नोंदविलेल्या रेकॉर्ड प्रमाणे अकोला ४३.९, अमरावती ४२.८, ब्रम्हपुरी ४२.२, गडचिरोली ४२.४, वर्धा ४२.५, वाशिम ४२.४ देखील चढत्या आलेखानुसार आघाडीवर आहेत. मे महिन्यात यातील अनेक जिल्हे तापमाना विक्रम मोडणार असल्याचे संकेत आहेत. विदर्भात सर्वात कमी तापमान सध्या गोंदियामध्ये आहे. सध्या येथे ३९ अंश तापमान नोंदविले गेलेले आहे.

### असा करा उष्माघातापासून बचाव

विदर्भात वाढत असलेल्या तापमानामुळे जिल्हा प्रशासनाने उष्माघातापासून बचावासाठी दक्षता घेण्याचे आवाहन पातळ, सच्छिद्र, सुती कपडे वापरावे. तहान नसली तरी जास्तीत जास्त पाणी प्यावे. बाहेर पडताना गॉगल्स, छत्री, टोपी वापरावी. प्रवासादरम्यान पाण्याची बाटली सोबत ठेवावी. उन्हाळ्यात काम करताना डोक्यावर टोपी, रूमाल, दुपट्टा वापरावा. शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास लिंबूपाणी, ताक, सरबत, ओआरएस आदींचा नियमित वापर करावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम अशी लक्षणे व चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. पशुधन व पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर, सनशेडचा







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## धोकादायक ठरतेय डीपफेक तंत्रज्ञान

*बुद्धीमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानात बरेच बदल होत आहेत. आपण अनेक ऑडिओ आणि व्हिडीओ असे पाहतो की ज्यामध्ये किती सत्यता आहे, हे ठरविणे कधीकधी अशक्य वाटते. देशामध्ये १८व्या लोकसभेसाठीच्या निवडणुकीचा ज्वर टीपेला पोहचत आहे. या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोपांच्या होत असलेल्या जुगलबंदीमुळे देशासह जगभरातील अनेक देशांचेही या निवडणुकीकडे लक्ष आहे. याचा पुढचा टप्पा म्हणून 'डीपफेक' तंत्रज्ञानाचा वापर राजकीय क्षेत्रातही मोठ्या खुबीने केला जात आहे. याचे ताजे उदाहरण द्यायचे झाले, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा सोमवारी व्हायरल झालेला 'डीपफेक' व्हिडीओ. डीपफेक व्हिडीओप्रकरणी केंद्रीय मंत्री शाह यांनी यामागे कॉंग्रेस असल्याचा आरोप केला, हा भाग अलाहिदा. परंतु तंत्रज्ञानातील प्रगती पाहून या निवडणुकीच्या काळात एखाद्या नेत्याच्या नावे बनावट ऑडिओ किंवा व्हिडीओ समाजमाध्यमांमध्ये पसरवला जाणे हे लोकशाही आणि सुरक्षिततेला निश्चितपणे धोकादायकच आहे. जात आणि समूदायाच्या आरक्षणाशी संबंधित संवेदनशील विषयावर मंत्री शाह बोलत असल्याचे खोटे चित्रित करणारा हा व्हिडीओ आहे. भारतात राजकीय पक्ष आणि नेत्यांभोवती 'डीपफेक' चा धोका वाढत चालला आहे. याची अनेक प्रकरणे यापूर्वीही समोर आली आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट, मोबाईल, ॲप्स यांनी प्रचार माध्यमांना गती दिली, त्यामुळे निवडणुकीत तळपत्या उन्हापासून नेत्यांचे काही प्रमाणात संरक्षण केले. मात्र, आता याच तंत्रज्ञानाचे तोटेही समोर येऊ लागले आहेत. आतापर्यंत फोटो किंवा व्हिडीओ छेडछाड केल्याची प्रकरणे समोर येत होती. पण, आर्टिफिशियल इंटेलिजन्सने (एआय) या फसवणुकीला इतके बारकावे दिले आहेत की, हे सर्व अगदी खऱ्या गोष्टींसारखेच दिसते. भारतामध्ये ९० कोटींहून अधिक मतदार आहेत. यातील जवळपास ८० टक्के मतदारांकडे इंटरनेट सक्षम मोबाईल आहेत. अशावेळी 'डीपफेक'ची भीती अधिक प्रमाणात आहे. मतदानाला काही दिवस शिल्लक असताना असे डीपफेक ऑडिओ किंवा व्हिडीओ व्हायरल झाल्यास त्याचा फटका उमेदवारांना सहन करावा लागतो. अर्थात उमेदवारांकडून नंतर खुलासे, स्पष्टीकरण देण्यात येईल, पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल. विशेष म्हणजे, भारतीय निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाची उपस्थिती अजून जाणवू शकली नसल्यामुळे त्यावेळच्या ऐच्छिक संहितेत 'डीपफेक'चा उल्लेख नव्हता. डेटानुसार, भारतातील स्मार्टफोन वापरकर्त्यांची संख्या २०१९ मध्ये पाचशे दशलक्ष होती. २०२३ मध्ये ही संख्या ६५० दशलक्षहून अधिक झाली. वेगाने होत असलेली ही वाढ कमी किमतीचे मोबाईल, हाय स्पीड इंटरनेटमुळे होत आहे. देशाची आतापर्यंतची सर्वात मोठी निवडणूक शांततेमध्ये होण्याची अपेक्षा असताना, मंत्री शाह यांच्या 'डीपफेक' व्हिडीओमुळे खळबळ उडवून दिली आहे. डीपफेकवर पंतप्रधान कार्यालय आणि आयटी मंत्रालयाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असल्याने, 'निवडणूक वॉचडॉग' ही या प्रकरणावर कठोर भूमिका घेणार का, हे पाहणे बाकी आहे. भारतामधील सात टप्प्यांत होत असलेल्या लोकसभा निवडणुकीतही खोटा प्रचार होण्याची भीती आता सर्वच राजकीय पक्षांना वाटू लागली आहे.*

# विरोधी आघाडीचा ताळमेळ 'वंचित'शी का जमला नाही?



विरोधक म्हणताहेत देश संकटात आहे. विरोधक आणि त्यांचे समर्थक म्हणताहेत देशाची लोकशाही संकटात आहे; दिवसेंदिवस माणसाच्या स्वातंत्र्याचा संकोच केला जात आहे; २०२४ नंतर देशात लोकशाही शिल्लक राहणार नाही. निवडणुका होणार नाहीत. लोकशाही वाचविण्यासाठी इंडिया आघाडी तयार झाली ना? मग किमान त्या आघाडीनं तरी सर्वांना समानतेनं वागवावं. कुणाचा अपमान करू नये– कोणी दुखावेल असं बोलू /वागू नये कारण ही साधी लढाई नाही.

भाजपकडे सत्ता आहे आणि त्याचा वापर विरोधकांना लुळे करण्यासाठी ते दहा वर्षे करीत आले आहेत. सर्व सरकारी यंत्रणा त्यांच्या हातात आहेत. एकदा निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली की आचारसंहिता काळ सुरू होतो– निवडणूक निर्भय,निरपेक्षपणे पार पाडण्यासाठी लोकप्रतिनिधींचे अधिकार या कालावधीत गोठवले जातात. पण यंदा त्याआधीच निवडणुकीच्या तोंडावर दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना अटक होते. भर आचारसंहिता काळात, लोकसभेच्या उमेदवारांनाही ईडी नोटीस बजावते. निवडणुका पारदर्शक, निर्भय वातावरणात पार पाडायच्या असतील तर निवडणूक कालावधी पर्यंत राजकीय कार्यकर्ते/नेते यांना संपूर्ण अभय असलेच पाहिजे.तशी पारीस्थिती देशात नाही आहे ही वस्तुस्थिती आहे.म्हणून विरोधक एकजुटीत असले पाहिजेत.

**विरोधकांची एकजूट आग्रही आहे काय?**

काही अपवादात्मक वेळी विरोधकांना कमालीची एकजूट दाखवावी लागते.१९७७ साली विरोधकांनी देशात प्रचंड एकजूट दाखवली.आणीबाणी उठली. लोकसभा निवडणूक जाहीर झाली.पंतप्रधान इंदिरा गांधींचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला. त्या स्वत: पराभूत झाल्या. तशी उत्स्फूर्तता,अभूतपूर्वता आज निर्माण झाली आहे काय? कोण करणार? देशातले विरोधक याबाबत कमी पडले आहेत काय? तर याचं उत्तर होय असंच द्यावं लागेल.

विरोधाकांमधला सर्वात मोठा जो पक्ष असेल त्यानंच याबाबत पुढाकार घ्यायचा असतो. तो पक्ष कॉंग्रेस आहे. कॉंग्रेस हा आजही राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष आहे. पूर्वी कॉंग्रेसमध्ये होते पण त्या पक्षात ज्यांचं नेतृत्व वाढू दिलं गेलं नाही असे नेते आता प्रादेशिक पक्षाचे नेतृत्व करतात. उदाहरणार्थ तृणमूल कॉंग्रेस. आणि काही जे कॉंग्रेसच्या विरोधात होते परंतु ते पुरोगामी विचारांचे आहेत त्यांची राज्य सरकारे आहेत आता ते कॉंग्रेसच्या इंडिया आघाडीत आहेत. या सर्वांचा एकच उद्देश आहे. तरीही ते एकत्र नाहीत.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आघाडी स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता. बिहारमधून जयप्रकाश नारायण आणीबाणीच्या वेळी पुढे आले होते आणि यावेळी त्यांचे शिष्य नितीश कुमार पुढे आल्यामुळे देशात काही तरी चांगलं निर्माण होईल असं लोकांना वाटलं. मग प्रश्न आला– आघाडीचा नेता कुणाला करायचं ह्न कारण तोच पंतप्रधान पदाचा उमेदवार असू शकतो. ममतांनी खरगेंचं नाव पुढे केलं. त्यांना राहुल गांधी नको असावेत. नितीश कुमार यांची अपेक्षा होती की इंडिया आघाडीचे लोक आपल्या नावाचा विचार करतील. पण तसं घडलं नाही त्यामुळे ते पुन्हा परत फिरले. भाजपच्या साथीला गेले. समाजवादी विचारांची इथे शोकांतिका झालेली दिसते. एका उद्दिष्टासाठी भिन्न विचाराचे लोक एकत्र येऊ शकतात. जसे जनसंघाचे लोक जनता पार्टी मध्ये होते. लोकशाही वाचविण्याच्या उद्देशाने इंडिया आघाडी स्थापन झाली असेल तर घटक पक्षामध्ये आपापल्या पक्षाच्या हिताच्या विचारापेक्षा लोकशाही वाचविण्याचा असला पाहिजे.भाजपला हरविण्याचा असला पाहिजे.तो इथे दिसत नाही.

प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी इंडिया आघाडीत सहभागी करून घेण्याची इंडिया आघाडीला आवश्यकता का वाटली नाही हा प्रश्न आहे. त्याची काही उत्तरंही उघडपणे दिसत आहेत. इंडिया आघाडीत आता शिवसेना उ.बा.ठा. हा बलाढ्य पक्ष सहभागी झालेला आहे. उद्धव ठाकरेंचा जनाधार आता वाढलेला आहे. त्यांचा पक्ष फोडणाऱ्यांच्या विरुद्ध लोक संतप्त झाले आहेत, त्यांना ते धडा शिकविणारच याची इंडिया आघाडीच्या घटक पक्षांना खात्री झाली आहे. दुसरं कारण म्हणजे कॉंग्रेस राष्ट्रवादीला २०१९च्या लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांनी किंमत दिली नाही याचा त्यांना मनस्वी राग आलेला आहे. तिसरे कारण असे असावे की प्रकाश आंबेडकर बौद्ध दलित समाजाचं पारंपारिक राजकारण न करता ते बहुजनांचं राजकारण करतात. मग आम्ही निराळे काय करतो? चौथे कारण : संविधान धोक्यात आहे त्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत प्रकाश आंबेडकरांना आमच्या मागून फरफटत यावंच लागेल आणि ते नाही आले तर आंबेडकरी जनता त्यांच्या मागे उभी राहणार नाही. हा त्यांचा विचार असावा. इंडिया आघाडीच्या घटक पक्षातल्या नेत्यांच्या वंचित बाबतच्या प्रतिक्रिया बघितल्या तर तसे वाटू लागते.

प्रकाश आंबेडकर यांची राजकीय कोंडी करण्याचे इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सुरुवातीपासूनच ठरविल्याचे दिसते. प्रकाश आंबेडकर यांचा स्वभाव लवचिक नाही, हे अन्य पक्षीय नेत्यांनाही माहीत आहे. मागच्या लोकसभा निवडणुकीच्या मानाने या वेळी त्यांची भूमिका जुळवून घेण्याची अधिक होती. त्यांनी मागितलेल्या जागा अवास्तव होत्या हे कुणालाही मान्य होऊ शकते. पण अधिक मागावं म्हणजे पुरेसं मिळेल ही त्यामागची भावना असावी. त्याच वेळी महाविकास आघाडीचे काही नेते सांगत होते की, प्रकाश आंबेडकर अडवणुकीची भाषा करीत आहेत. त्यांना मागच्यासारखेच करायचे आहे. त्यांची भूमिका भाजपला धार्जिणी आहे. नाना पटोले यांची भूमिका धरसोडीची वाटत होती. त्याचे कारण प्रकाश आंबेडकर त्यांना विशेष महत्व देत नव्हते. ते त्यांच्या वरच्या पदाधिकाऱ्यांनी आमच्याशी बोलावं अशी मागणी करीत होते. पटोले यांना ते खटकत असावं. त्यामुळे ते वंचितला गांभीर्याने घेत नव्हते. दुसरीकडे संजय राऊत दरदिवशी चित्रवाणी वाहिन्यांना सांगत होते, वंचितशी आमची युती पक्की आहे. आम्ही लवकरच त्यांच्याशी चर्चा करणार आहोत. आमची चर्चा झाली आहे. वंचितला आम्ही आघाडीत सहभागी करून घेणार आहोत. त्यांचा आमच्याकडे जागांचा प्रस्ताव आलेला आहे. आम्ही त्यावर चर्चा करू आणि त्यातून समाधानकारक मार्ग काढू. मार्ग निघाला आहे. त्यांनी दिलेल्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. वंचितला आम्ही चार जागा सोडल्या आहेत. अधिक जागांवर आम्ही विचार करतो आहोत. संजय राऊत यांची अशा प्रकारे टोलवाटोलवी चालू होती. या चार जागांपैकी एक अकोल्याची जागा सोडली तर 'उरलेल्या जागा आम्ही मागितलेल्या नाहीत. तिथे आमची ताकदही नाही, ' असा खुलासा वंचितने केला आहे.महाराष्ट्रात महाविकास आघाडीची निर्विवाद ताकद तयार झाली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी कॉंग्रेसला सात जागांवर पाठिंबा द्यायचे कबूल केले आहे. त्याप्रमाणे दोन जागांवर कॉंग्रेसने पाठिंबा मागितलेला नसतानाही वंचितने तो दिला आहे.उरलेल्या जागांवर कॉंग्रेसने पाठींबा मागितला तर देतीलही ते. कॉंग्रेसने मात्र अकोला जागेवर आपला उमेदवार घोषित केलेला आहे. महाविकास आघाडीची ही खेळी अनाकलनीय वाटते. महाविकास आघाडीची ताकद यंदा अधिक आहे हे मान्य केले तरीही सेक्युलर मतांची विभागणी होऊ नये म्हणून वंचितला महाविकास आघाडीत सहभागी करून घेतले पाहिजे होते की नाही? प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू असल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राच्या बाहेर उपयोग करून घेता येईल काय हेसुद्धा पहिले असते तर बरे झाले असते. त्याचबरोबर देशातल्या दलितांना प्रकाश आंबेडकर यांच्या माध्यमातून आवाहन करण्यात आले असते तर त्याचा फायदा महाविकास आघाडीला झाला असता काय हेसुद्धा अजमावून पाहाता आले असते. असो. वंचित बहुजन आघाडी स्वतंत्रपणे लोकसभेच्या निवडणुका लढविणार हे आता स्पष्ट झाले आहे त्याचा महाविकास आघाडीला कितपत फटका बसतो की फायदा होतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. – साभार

# भेट : एका देव माणसाची



गोष्ट एका प्रवासातली.४–५ दिवसांपूर्वीची.वर्ध्याहून पुढे१० मैलांवर गाडी अचानक बंद पडली. भर दुपारी,रखरखत्या ऊन्हात.दुरुस्तीच्या प्रयासात १तास गेला.नाही जमले.मग नागपूरहून दुसरी गाडी बोलावली.यात ३ तास गेले.कसे?. बाजूला एक शेत होतं.गेटवर वकिलाची पाटी.आत चौकीदार असावा.पाणी मागावं म्हणून आत गेलो.बनियन–पैजामा घातलेला एक गृहस्थ भेटला.त्याला विनवणी केली.बोलताना लक्षात आलं,तो मालकच होता.साधा–सरळ.मीही शेतकरीच.त्यामुळे बोलका झाला तो.त्यानं आपल्या शानदार कुटीत नेलं.झुल्यावर बसवलं.दरम्यान माझी मिसेस वर्षा व मुलगाही आला.थंडगार पाणी मिळालं.जीव तृप्त झाले!हे कुटुंबच इथं शेती– मातीत राहणारं..राबणारं.त्यानं आपली जीवनयात्रा सांगितली.

दरम्यान बाईनं चहा आणला.तीही सुस्वभावी.म्हणाली,घरच्याच गायीच्या दुधाचा.तो बोलत राहिला.मन मोकळं करत राहिला.मग शेतातीलच पपई खायला दिली.वाटलं–आपण कोण, कुठले?पण काही परकेपण नाही.आम्ही जणू पाहुणपणच भोगलं ! तिथल्या चिंचा, कढिपत्ताही सोबत मिळाला.या भल्या माणसाची दोन्ही मुलं नोकरीत.पण इथंच राहतात जंगलात गुण्यागोविंदानं, सुनाबाळांसोबत. गाडी आली तेव्हा निरोप घेताना का कुणास ठाऊक, तो म्हणाला,आम्ही ब्राह्मण.मी म्हणालो, तुम्ही ब्राह्मण नाही,माणूस आहात.कर्माची पुजा करणारा..जातिधर्माच्या व कर्मकांडाच्या पलीकडला.देवमाणूस! आम्ही गाडीत बसलो तेव्हा त्याच्या डोळ्यांत आनंद तरळून आला होता.मी तो हळव्या हृदयानं वाचला.वाटलं,अजूनही माणूसपण जपणारी चांगली माणसं आहेत जगात.निसर्गाच्या व सोज्वळ माणसांच्या सहवासात ३ तास कसे गेले कळलेच नाही.वाळवंटातल्या मुक्कामाचं नंदनवन झालं होतं!अशी माणसंच आपलं जगणं समृद्ध करतात ना?

निघालो तेव्हा रस्त्यानं माझीच कविता आठवली ह्न
मंदिर मंदिर फिरलो नाही स्वर्गासाठी,
***देवमाणसांसवे काढला जन्म सुखाने..!***
***देवमाणसं याहून वेगळी काय असतात ?***

**ह्न बबन सराडकर ,**
अमरावती

# युवकांना प्राईड ऑफ अमरावती अवॉर्ड देणार

## डॉ मनीष गवई यांची घोषणा

### अमरावती युथ आयकॉन अवॉर्डसाठी युवकांचे प्रस्ताव आमंत्रित



अमरावती : युवा हा देशाच्या विकासाचा महत्वपूर्ण केंद्रबिंदू असून युवकांमध्ये देश परिवर्तनाची ताकत असते त्यामुळे या तरुणांना विधायक दिशा देणे महत्वाचे आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाजया युवकांना अमरावती युथ आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करणार असल्याची घोषणा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी संघाचे राष्ट्रीय सचिव तथा अंतराष्ट्रीय सार्क संघटनेचे युवा दूत अल्पसंख्याक आयोगाचे सल्लागार सदस्य डॉ मनीष गवई यांनी केली. अमरावतीत मतदानाला प्रोत्साहन देणाजया युवकांना प्राईड ऑफ अमरावती अवॉर्ड देऊन सन्मानित करणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी अमरावतीतील कर्तृत्ववान युवकांचे प्रस्ताव आमंत्रित करण्यात आले आहेत. भारतासारख्या लोकशाही देशात प्रत्येक युवकाने आपले कर्तव्य समजले पाहिजे प्रत्येक तरुणाने त्यांच्या कर्तव्य जबाबदारीचे भारतीय संविधानाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे देश विकासाच्या प्रक्रिये मध्ये अमरावती तील युवकानी आपली भूमिका ठामपणे पार पडली आहे.

आज अमरावतीचे नाव देशपातळीवर उंचावणारूया युवकांना अमरावती युथ आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करणार असलयाची घोषणा राष्ट्रीय युवा पुरस्काराचे संघाचे राष्ट्रीय सचिव अमरावतीचे सुपुत्र डॉ मनीष गवई यांनी केले असून अमरावतीत मतदानाला प्रोत्साहन करणारूया युवकांना ज्या युवकांनी सोशल मीडिया, रॅली,रील्स,फेसबुक, इंस्टाग्राम, पंथनाटच्याच्या माध्यमातून मतदानाविषयी जनजागरण केले तसेच स्वत: मतदान करून इतरांना मतदान करण्यासाठी करण्यासाठी प्रोत्साहन देणाजया, तसेच वृद्ध, दिव्यांग मतदारांना मतदान करण्यासाठी मदत करणाजया तरुणांना प्राईड ऑफ अमरावती अवॉर्ड देऊन सन्मानित करणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी अशा तरुणांनी आपली माहिती मुख्य संयोजक डॉ.मनीष गवई ९३७०१००८९८ एपीजे न्युजचे संपादक नदीम अहमद ९१७५१४२७८६, टीम झेनिथ इंटरनॅशनलचे संयोजक मिथिल कळंबे ९३७०१५२२७७, लाईफ डेव्हलोपमेंट सोसायटीचे नरेंद्र गुलदेवकर ९८३४९१८७०८, अम्बिशन डान्स अकॅडेमिचे भारत मोंढे ८४१२९९२१४८, दैनिक मतदार राजचे संपादक विजय गायकवाड ९६३७६३२०२४ या क्रमांकावर आपली माहिती पाठवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# विटाळा येथे सिलेंडरचा स्फोट

धामणगाव रेल्वे: तालुक्यातील विटाळा येथे एका घरात गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने घरातील धान्यासह सर्व वस्तू आगीच्या भक्ष्यस्थानी गेले .परंतु सतर्कतेमुळे जीवित हानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार असे की,तालुक्यातील विटाळा येथे विजय दत्तायत्र भेंडे यांचे घर आहे.यांच्या पत्नी ममता भेंडे ह्या मंगळवारला (ता.३०) सायंकाळी दिवाबत्ती करायचा असतांना अचानकपणे घरातील गॅस सिलेंडरने पेट घेतला.हे लक्षात येताच स्फोट ममता भेंडे ह्या घराबाहेर पडल्या.त्यामध्ये घरातील वस्तू चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सिलेंडर स्फोट एवढा भयंकर होता की ,सिलेंडर हे उडून घरावरील टिन पत्रे फाडून बाहेर उडाले .दोन क्विंटल कापूस, एक मोबाईल, एक दिवाण, गॅस सिलेंडर ,एक टीव्ही ,रोख रक्कम १२ हजार रुपये, पंखे व मोठ्या प्रमाणात घरगुती वस्तूंचे नुकसान यामध्ये झाले आहे .सिलेंडर स्फोट मध्ये अंदाजे दीड लाख रुपयाचे विजय दत्तात्रय भेंडे यांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.



# ग्रामजयंती निमीत आयोजीत हृदयरोग शिबीरात २०० रुग्णांनी घेतला लाभ



अमरावती : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्य पोटे आयुर्वेद रूग्णालयात आयोजीत हृदयरोग शिबीरात २०० च्या वर रुग्णांनी तपासणी केली. यातील ५० रुग्णांना पुढील उपचाराकरिता श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल, अमरावती येथे जाण्याचा सल्ला दिल्या गेला. हे शिबीर पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन अॅन्ड वेलफेअर ट्रस्ट व्दारा संचालीत पी आर पोटे पाटील इन्स्टिटयुट अॅन्ड हॉस्पीटल ऑफ मेडीकल सायन्सेस आयुर्वेद व श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल, अमरावती यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्य दिनाक ३० एप्रिल ला पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद रूग्णालयात हृदयरोग निदान, उपचार व मार्गदर्शन शिबीर आयोजीत करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते तर श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल चे सचिव प्रा. सागर फासेबंद, डॉ. गौरव वसुले, डॉ. राहुल मानकर, डॉ. विलास मोडक, डॉ. प्रशात लहाने, डॉ. कमलेश पाटील, डॉ. स्वाती सरनाईक यांच्या उपस्थितीत पार पडले. या प्रसंगी प्रा. सागर फासेबंद यांनी श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटलच्या प्रगतीचा आलेख व उपलब्ध माहिती उपस्थितांना दिली. या प्रगती मागे आमदार प्रविणभाऊ पोटे पाटील यांचे मोठे योगदान आहे हे त्यांनी कृतज्ञतापुर्वक सांगितले. उद्घाटक म्हणुन बोलताना श्रेयशदादा पोटे पाटील यांनी रूग्णालयामुळे सामान्यांना आरोग्याची कमी खर्चात व कमी वेळात कशी सोय झाली याचे विवेचन केले आणि भविष्यात आमची संस्था आपल्या रूग्णालयासोबत सर्व स्तरावर काम करण्यास तया आहे अशी ग्वाही दिली. शिबीराचे प्रास्तावीक व आयोजना मागची भूमिका महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ श्याम भुतडा यांनी मांडली या शिबीराचे सुत्रसंचलन डॉ. स्वाती सावरकर तर आभार प्रदर्शन डॉ. हेमलता माहोरे यांनी केले. शिबीर यशस्वीतेकरिता डॉ. चैतन्य कायलकर, डॉ. गौरव खवले, डॉ. दिलीप चहाटे, डॉ. अनिरूद्ध भोपाळे, डॉ. संकेत जयस्वाल डॉ. राजेश ठाकरे, डॉ. रोहित भावसार, पंकज बगणे, अजिंक्य माहोरे, प्रज्ञा मनवर, ऑशिनी मोहोड, ज्योस्तना परतेकी, पल्लवी मंगरे, प्राजक्ता वाडेकर, दामिनी मेश्राम, विशाखा सौरे, पायल आडे, शैलेश बोरकर, मंगेश रताळे आदीनी परिश्रम घेतले.

# लोकसभा निवडणुकीत ६२ हजार ५८ मतदान वाढले

## ८,७२५ कर्मचाऱ्यांनी बजाविले निवडणूक कर्तव्य १०० पथकांची भूमिका ठरली महत्वाची

अमरावती : अमरावती लोकसभेकरीता २६ एप्रिल रोजी मतदान पार पडले. यामध्ये एकूण मतदारांच्या ११ लाख ६९ हजार १२१ मतदारांनी मतदान केलेले असुन यांची टक्केवारी ६३.६७ टक्के आहे. मागील २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये ११ लाख ७ हजार ६३ मतदान झालेले होते. यामध्ये मागील पंचवार्षिकच्या तुलनेत ६२ हजार ५८ मतदान वाढले आहे. निवडणुकीच्या कामात जिल्ह्यातील ८ हजार ७२५ कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य चोखपणे बजाविले आहे. याशिवाय गठीत करण्यात आलेल्या १०० पथकांची भुमिका देखील महत्वाची ठरली.

अमरावती सार्वत्रिक लोकसभेची निवडणूकीत निवडणूकीकरीता एकुण १८ लाख ३६ हजार ७८ मतदार मतदानाकरीता पात्र होते. सदर निवडणूकीकरीता [illegible]यात आली. व यामध्ये १९८३ मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया पार पाडण्याकरीता १ केंद्राध्यक्ष व ३ मतदान अधिकारी असे एकुण ७ हजार ९७२ कर्मचाऱ्याची मतदान केंद्रावर नेमणूक करण्यात आली. तसेच १० टक्के पथकाकरीता ७९३ कर्मचारी राखीव ठेवण्यात आले होते, असे एकुण ८ हजार ७२५ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. याशिवाय जिल्हास्तरावर एसएसटीचे २१ पथक, व्हिएसटीचे २३ व एफएसटीचे ५६ असे एकुण १०० पथके तयार करण्यात आली. तसेच दिव्यांग व ८५ मतदारांना मतदानाचे सुविधेकरीता घरोघरी जावून मतदानाची प्रक्रिया दिनांक १२ ते १४ एप्रिल या कालावधीत ११०४ व अत्यावश्यक सेवा मतदार ७ असे एकुण १ हजार १११ मतदारांचे मतदान झालेले आहे. मतदान जनजागृतीकरीता देखील मोठ्या प्रमाणात स्वीपच्या वतीने कार्यक्रम राबविण्यात आले. त्यांना काही प्रमाणात यश देखील आले. २५ वर्षात प्रथम मतदानाची टक्केवारी ६३ टक्केच्या वर गेलेली आहे. मात्र मागील पंचवार्षिकच्या तुलनेत ही टक्केवारी कमी असली तरी या पाच वर्षात ६२ हजार ५८ मतदान वाढले आहे लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचे मतवानाचे दिवशी काही मतदान केंद्रावर मतदारांची नांवे मतदार यादीमध्ये सापडत नसलेबाबत किंवा मतदारयादीमधुन नावे गहाळ झाल्याची ओरड झाली. परंतु निवडणुक विभागाच्या मते मतदारयादी पुनरिक्षण कार्यक्रमात मतदारांना आक्षेप घेण्याची संधी देण्यात आली होती. याशिवाय नामांकनाच्या १० दिवसापूर्वी पर्यंत देखील मतदान नोंदणी करण्यात आली. परंतु यामध्ये देखील मतदारांना नावे नोंदविली नाही. त्यामुळे अशा मतदारांकरीता आता पुन्हा नावे नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नांवे मतवार यादीमध्ये समाविष्ट करणेकरीता फार्म क्रमांक ६ भरुन फार्मसोबत आधारकार्ड, किंवा शाळेची टि.सी. किंवा इतर जन्मतारखेबाबत पुरावा, व राहिवाशी पुरावा, सोबत जोडून संबधीत बिएलओ, ऑनलाईन तसेच व्हिएचए मोबाइल अॅप किंवा सिईओ महाराष्ट्र या वेबसाईवरून नोंदणीची सुविधा आहे. याशिवाय विधानसभा मतदारसंघाचे कार्यालय किंवा तहसील कार्यालय येथे सुविधा असल्याची माहीती जिल्हाधिकारी यांनी दिली आहे.

# कर्जासाठी अमरावती तहसीलच्या नावे बोगस 'एनओसी'

बडनेरा : जमिनीबाबत अमरावती तहसीलच्या नावाने बोगस ना-हरकत [illegible] सादर करून कर्ज घेण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र अमरावती तहसील प्रशासनाच्या ही बाब निदर्शनात आल्यामुळे सदर प्रकरणाचे भिंग फुटले. त्यामुळे याप्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फराज बेग (२७) व शहेबाज बेग शहादत बेग (२९) दोघेही रा. इंगोलेपुरा मरकज मशीदजवळ बडनेरा अशी आरोपींची नावे आहेत. म्हसला येथील शेत सर्वे ४३/२ या जमिनीच्या आधारे बोगस कागदपत्र तयार करून खासगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेण्याचा बेत आरोपींनी आखला होता. त्यासाठी त्यांनी सदर जमिनीबाबत बोगस सहीशिक्क्यांसह अमरावती तहसीलचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तयार करून घेतले.

# जांभळ्या साडीत मानसीच्या झक्कास अदा

*घटस्फोटानंतर मराठी अभिनेत्री मानसी नाईक तिच्या ग्लॅमरस लूकनं नेहमीच चर्चेत असते. सध्या तिची सिव्हलेस ब्लॉऊजवर जांभळ्या रंगाच्या साडीत दिलखेचक अदा सोशल मीडियावर पाहायला मिळाली. तिने तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोज आणि व्हिडिओने कती पुन्हा एकादा चर्चेत आली आहे. नेटकऱ्यांनी तिच्या या लूकवर भरभरून कौतुकाचा वर्षाव करताना कॉमेन्टसचा पाऊस पाडलाय.*

*हिंदी, मराठी अभिनेत्री मानसीने नुकतेच तिच्या इन्साग्रामवर भर उन्हात आणि रत्यावर उभारून काही फोटो शेअर केलं आहेत. या फोटोत मानसीने जांभळ्या रंगाच्या ब्लॉऊजवर त्याच रंगाची साडी परिधान केल्याचे दिसतेय. मात्र, तिच्या या फोटोवरून नजर हटेना इतकी मानसी सुंदर फोटोत दिसत आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये तिने विटावर विटा सात विटा ख डौंश ण झळश्रश्री वमहृ॰ बाकी सगळ्या फुटा !!! असे लिहिले आहे. याशिवाय तिने तिच्या घरातील खिडकीत बसून आणि घराच्या समोर एकापैक्षा एक हॉट पोझ दिल्यात.मानसीने शेअर केलेल्या व्हिडिओत ती एका कव्वाली गाण्याच्या तालावर एक झाडाजवळ येताना दिसतेय. यावेळच्या तिच्या मोहक अदावर चाहत्यांच्या नजरा पडल्या आहेत. याशिवाय तिने आणखी एका हिंदी गाण्यावर रिल्स बनवले आहे. या गाण्याचे बोल मेरे दिल के आयने में तस्वीर है तुम्हारी, अब तुम्ह तो बन गये हो जिंदगी हमारी, ये दुवा है मेरे रब से, तुम्हे सादगी मे सबसे, मेरे सादगी पंसत आये असे आहेत.*



# यवतमाळात चार महिन्यांत अमलीपदार्थविरोधी ३० कारवाया

## तरुणाईसह अल्पवयीन मुलांकडून नशा, गांजासह एमडी ड्रग्जची 'खेप'

यवतमाळ : कधीकाळी शांतप्रिय शहर अशी ओळख असलेल्या यवतमाळसह जिल्ह्यात गुन्हेगारी झपाट्याने वाढली आहे. या गुन्हेगारीचे मूळ गांजा आणि एमडी ड्रग्जच्या नशेशी जुळलेले आहे. तरुणाई सह अल्पवयीन मुले 'दम मारो दम 'म्हणत धूर सोडत आहे. जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत पोलिसांनी तब्बल ३० कारवाया केल्याने चिंता वाढली आहे. चिंता वाढली आहे. यवतमाळ शहरासह जिल्हाभरात गुन्हेगारीतून पडलेले हत्याकांड, प्राणपातक हल्ल्यांसारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी नशेखोर असल्याचे अनेकदा समोर आले. या आरोपींकडून केवळ दारूच नाही तर गांजा, एमडी ड्रग्ज वासारख्या अमलीपदार्थांचा नशा करून गुन्हे घडविण्यात आल्याचेही तपासात उघड झाले. गुन्हेगारी वर्तुळासोबतच युवक तसेच अनेक महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थी देखील व्यसनाधिन झाले आहे. गांजा, एमडी ड्रग्जचा नशा करण्याची लतच त्यांना लागली आहे. जिल्ह्यात गांजा, एमडी ड्रग्जची मोठ्या प्रमाणात 'खेप' आणली जाते. या अमलीपदार्थांच्या तस्करीचे कनेक्शन नागपूर, मुंबईसह परराज्यात जुळलेले आहे. तस्करीचे मोठे नेटवर्क सक्रिय असून, पोलीस कारवायांनंतर देखील नशेचा व्यापार थांबलेला नाही. जानेवारी ते एप्रिल या कालावधीत अमलीपदार्थासंबंधी पोलिसांनी तब्बल ३० कारवाया केल्या. गतवर्षी याच चार महिन्यांच्या कालावधीमध्ये अवघ्या दोन कारवाया झाल्या होत्या. यावर्षीची चार महिन्यांतील आकडेवारी पाहता नशेखोरांची संख्या वाढली असून, अमलीपदार्थातून उलाढाल देखील वाढल्याचे स्पष्ट होत आहे. गांजा सोबतच एमडी ड्रग्जच्याही तीन ते चार कारवाया जिल्ह्यात पोलिसांनी यापूर्वी केल्या आहे.

मात्र गांजा व एमडी ड्रग्ज तस्करीतील सूत्रधार पोलिसांना शोधून जेरबंद करता आले नाही. त्यामुळे पोलिसांसमोर नशेच्या व्यापाराचे नेटवर्क उखडून फेकण्यासाठी वा व्यापारातील खरे सूत्रधार शोधण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.महाराष्ट्राला लागून गुजरात, तेलंगणा, आंधप्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक आदी राज्ये आहेत.

# कोट्यवधींच्या कामांना आचारसंहिता शिथिल होण्याची प्रतीक्षा

अमरावती : निवडणुकीच्या आचारसंहितेचा फटका जिल्हा परिषदेतील ४० कोटींच्या कामांना बसला आहे. कारण ही सर्व कामे निविदा प्रक्रियेत अडकली आहे. याशिवाय टंचाई निवारणार्थ कृती आराखड्यातील १३ कोटींची कामे देखील आचारसंहितेमुळे रखडल्याने या सर्व कामांना आता आचारसंहिता शिथिल होण्याची प्रतीक्षा लागली आहे. परंतु महाराष्ट्रात २५ मेपर्यंत लोकसभेच्या निवडणुका असल्याने यात शिथिलता मिळते की पुन्हा एक महिना प्रतीक्षा करावी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. देशात १६ मार्च रोजी लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे जी कामे ज्या स्थितीत आहे, त्याच स्थितीत थांबली. यामध्ये जिल्हा परिषदेचे २०२३-२४ मधील ४० कोटी ८६ लाखांची १६३ कामे रखडली. तसेच टंचाई निवारणार्थ कृती आराखड्यातील १३ कोटी ५७ लाख रूपयांची १४४ कामे देखील निविदा प्रक्रियेत अडकली. अशा सुमारे ५४ कोटी ५३ लाखांची कामे आचारसंहितेमुळे रखडली आहे. याला सव्वा महिना आधीच लोटला आहे. २६ एप्रिल रोजी अमरावतीत मतदान पार पडले. परंतु मतमोजणी ही ४ जून रोजी आहे. त्यामुळे आणखी ३९ दिवस निवडणूक प्रक्रिया कायम राहणार आहे.

परंतु मतदान आटोपल्याने आचारसंहिता शिथिल होण्याची अपेक्षा आता स्थानिक स्वराज्य संस्थांना लागली आहे. आचारसंहिता शिथिल होईल की पुन्हा ४ जूनपर्यंत या कामांना ब्रेक कायम राहील, याबाबत निवडणुक आयोग काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिवे मारण्याची धमकी

परतवाडा : फिर्यादी व त्यांच्या मुलाशी क्षुल्लक कारणावरुन वाद घालून आरोपीने काठीने मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना जुनी वस्ती कांडली येथे सोमवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली. महिलेच्या तक्रारीवरुन परतवाडा पोलिसांनी वसंत विठ्ठल वाकोडे (४२) रा. वनश्री कॉलनी, परतवाडा याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेच्यावेळी फिर्यादी घरी असताना आरोपी तेथे आला व फिर्यादीसोबत क्षुल्लक कारणावरुन वाद घालत शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी व त्यांच्या मुलाला काठीने मारुन जखमी केले.





TRiLOGiC
COMPUTERS & SERVICES
Cell no. : 08928399966, 09764399966




आमची अमरावती
आमची दुग्धपुर्णा

पोस्टमध्ये पैसे सुरक्षीत राहतात, असा लोकांचा ठाम विश्वास होता. इतकेच नव्हे तर शहरात इतर बँकांची सुरुवात होण्यापूर्वी सर्वात जास्त पैसा या डाकघरातील येत होता. आजही हेड पोस्ट कार्यालयात गेल्यास जाडजूड गज असलेली ट्रेझरी आहे. ग्रामीण भागात एखाद्या खातेदाराने हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम काढल्यास पोलीस बंदोबस्तात त्यांच्या घरापर्यंत रक्कम पोहोचवली जात असे. यामुळे लोकांचा डाक खात्यावर विश्वास होता. ही पद्धत १९६५ पर्यंत अस्तीत्वात होती. हजार रुपयांच्यापेक्षा अधिक रक्कम काढावयाची असल्यास सब पोस्ट ऑफीसमध्ये पैसे येत. तेथून खेडेगावातील ब्रँच ऑफीसमधून पैसे ग्राहकांपर्यंत सुरक्षित पोचवले जात. पोस्टमास्तरला मात्र पोलिसांच्या आणि कॅश ओव्हरसिअरच्या जेवणाची व्यवस्था करावी लागत असे. कारण सहा मैल पायी चालत आलेली मंडळी त्या दिवशी चक्क पोस्टातच मुक्कामी असायची. असे हे पोस्ट पुराण!!

दुग्धपूर्णा
राजकमल चौक, अमरावती. फोन : २५६२६६२


गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF-COLOUR)